Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ५] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी ३-९, २०२२/माघ १४-२०, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक–अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-४ |
| **भाग एक-अ.**–(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | नाही. |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १५२.

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) तथा सदस्य सचिव, यांजकडून**

**वाचा** :(१) शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र. संक्रिर्ण ०३-२०१५-प्र.क्र. २४-अ-२, दिनांक १२-५-२०१५.

(२) शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र. संक्रिर्ण ०३-२०१५-प्र.क्र. २४-अ-२, दिनांक ३०-९-२०१५.

(३) म. शा. महसूल व वनविभाग यांचे परिपत्रक क्र. एलक्युएन-०१-२०१७-प्र.क्र. १२-भाग अ-२, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक २५-१-२०१७.

**खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेणेबाबत**

क्रमांक मं.अ.-विभूसअ.(अवप्र) क्र. ४-कावि-०६-२०२२.—

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांनी मौजा खरपी, ता. अचलपूर येथील सपन मध्यम प्रकल्पाच्या खरपी वितरिकेच्या कामाकरिता या प्रयोजनाकरिता शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. ०३-२०१५-प्र.अ. ३४-अ-२, दिनांक १२-०५-२०१५ व दिनांक ३०-०९-२०१५ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम

प्रकल्प विभाग, अमरावती यांचे नावे घेण्याबाबत त्यांचे पत्र क्र. जा. क्र. ५०५-अमप्रवि-रेशा-सपन नदी प्रकल्प-सरळ खरेदी प्रस्ताव-२०२१, दिनांक १०-२-२०२१ नुसार भूसंपादन प्रस्ताव ६-४७-२०२०-२०२१, मौजा खरपी, ता. अचलपूर, जि. अमरावती एकूण क्षेत्रफळ ० हे. ३८ आर. चा प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश पत्र क्र. १३७-२०२१, दिनांक २-३-२०२१ अन्वये कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती त्यांचे पत्र क्र. जा. ५०५-अमप्रवि-रेशा सपन नदी प्रकल्प-सरळ खरेदी प्रस्ताव-२०२१, दिनांक १०-२-२०२१, संपादन क्षेत्राबाबत सरळ खरेदीने मुल्य निश्चितीबाबत उक्त प्रस्तावासंबंधी शासन निर्णय दिनांक १२-०५-२०१५ व दिनांक ३०-०५-२०१५ आणि त्या अनुषंगाने शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र.एलक्युएन-०१-२०१७-प्र.क्र.१२-अ-२, दिनांक २५-०१-२०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी, आता,

(१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) (अवप्र), क्र. ४, अमरावती तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय समिती, अमरावती याद्वारे,

**अनुसूची (एक)**

खाजगी क्षेत्रातील जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे, आणि

**अनुसूची (दोन)**

प्रकल्पासाठी जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने संपादित करतांना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या शेड्युल १ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणा-या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५ टक्के रक्कम वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल.

**अनुसूची (तीन)**

संबंधित भूधारकाकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे नावे खरेदी करुन देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः अंतिमरित्या स्वीकारण्यास तयार असल्याबाबतचे संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे.

(२) संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचेकडे दाखल करावीत.

(३) संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

(४) सदर रस्त्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या पुनर्वसन आराखड्याची प्रत कार्यकारी अभियंता, अमरावती मध्यम प्रकल्प विभाग, अमरावती यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

## अनुसूची (चार)

भूसंपादन (सरळ खरेदी) प्रकरण क्रमांक ६-४७-२०२०-२१, मौजा खरपी, ता. अचलपूर, जि. अमरावती येथील सपन मध्यम प्रकल्पाच्या खरपी वितरिकेच्या कामाकरिता समाविष्ट (खरेदी करावयाच्या) खाजगी जमिनीचा तपशील.—

### अनुसूची

| अ. क्र. | मौजा | गट/सर्व्हे क्रमांक | भूधारणा प्रकार | नमुना ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र | खरेदी करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | हे. आर | हे. आर |
| १ | खरपी | ४३३ पैकी | १ | १ ४० | ० १२ |
| २ | खरपी | ४३३ पैकी | १ | २ ०१ | ० ०५ |
| ३ | खरपी | ७२ पैकी | १ | ० ६२ | ० २१ |
| | | | | एकूण . . | ० ३८ |

अमरावती :
दिनांक ५ जानेवारी २०२२.

**मनिषकुमार गायकवाड,**
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
अपर वर्धा प्रकल्प क्र. ४,
तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय समिती,
अमरावती.

---

भाग १ (अ. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १५३.

**वाचा** :(१) शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र. संक्रिर्ण ०३-२०१५-प्र.क्र. ३४-अ-२, दिनांक १२-५-२०१५.

(२) शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र. संक्रिर्ण ०३-२०१५-प्र.क्र. ३४-अ-२, दिनांक ३०-९-२०१५.

(३) म. शा. महसूल व वनविभाग यांचे परिपत्रक क्र. एलक्युएन-०१-२०१७-प्र.क्र. १२-भाग अ-२, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक २५-१-२०१७.

### खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेणेबाबत

क्रमांक मं.अ.-उपजिभूसं-लसिंकामे-कावि-६३-२०२२.—

ज्याअर्थी, कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांनी पाक नदी प्रकल्पाचे बुडीत क्षेत्राचे प्रयोजनाकरिता शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. ०३-२०१५-प्र.अ. ३४-अ-२, दिनांक १२-०५-२०१५ व दिनांक ३०-०९-२०१५ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने त्यांचे कार्यालयीन पत्र क्र. जा. क्र. २९४४-२०२०-अपाविश-रेशा-पाक नदी प्रकल्प-सखप्र-२०२०, दिनांक १०-११-२०२० नुसार सरळ खरेदी प्रस्ताव क्र. ०७-४७-२०२०-२०२१, मौजा लाखारा, ता. मोर्शी, जि. अमरावती एकूण क्षेत्रफळ ०.१३ हे. आर. चा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांचे मार्फत प्राप्त झाला आहे. तथापि, उपअधीक्षक, भूमी अभिलेख, मोर्शी यांचे पत्र जा.क्र. ५३४७, दिनांक ९-११-२०२० नुसार प्राप्त संयुक्त मोजणी अहवालानुसार सदर प्रस्तावाचे अंतीम क्षेत्र ०.१३ हे. आर निश्चित करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश पत्र क्र. अ.का.-प्र.अ.-भूसंपादन-कावि-६०९-२०२०, दिनांक १६-१२-२०२० अन्वये उक्त प्रस्तावासंबंधी शासन निर्णय दिनांक १२-०५-२०१५ व दिनांक ३०-०९-२०१५ आणि त्या अनुषंगाने शासन निर्णय तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एलक्युएन-०१-२०१७-प्र.क्र.१२-अ-२, दिनांक २५-०१-२०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्याअर्थी, आता,

(१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), लघुसिंचन कामे, अमरावती तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय समिती, अमरावती याद्वारे—

## अनुसूची (एक)

खाजगी क्षेत्रातील जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे. आणि;

## अनुसूची (दोन)

पाक नदी प्रकल्पाचे बुडीत क्षेत्राचे प्रयोजनाकरिता जमिनी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने संपादित करतांना जिल्हास्तरीय समितीमार्फत भूमी संपादन पुनर्वसन आणि पुनर्स्थापना करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलमे २६ ते ३० च्या शेड्युल १ च्या तरतुदीनुसार संबंधित जमिनीसाठी परिगणित होणा-या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५ टक्के रक्कम वाढीव देऊन मोबदला निश्चित करण्यात येईल.

## अनुसूची (तीन)

संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचे नावे खरेदी करुन देण्यास स्वच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णतः अंतिमरित्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतचे संमतीपत्र (विकल्प) मागवित आहे.

(२) संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्र (विकल्प) कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचेकडे दाखल करावीत.

(३) संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

(४) सदर रस्त्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या पुनर्वसन आराखड्याची प्रत कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांचे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हितसंबंधित व्यक्तींना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

## अनुसूची (चार)

सरळ खरेदी प्रकरण क्रमांक ७-४७-२०२०-२१ मौजा लाखारा, ता. मोर्शी, जि. अमरावती येथे पाक नदी प्रकल्पाचे बुडीत क्षेत्राचे प्रयोजनाकरिता समाविष्ट (खरेदी करावयाच्या) खाजगी जमिनीचा तपशीलः

## अनुसूची

| अ. क्र. | मौजा | गट/सर्व्हे क्रमांक | भो. व | नमुना ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र | खरेदी करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | हे. आर | हे. आर |
| १ | लाखारा, ता. मोर्शी, जि. अमरावती | ६२/१अ | १ | ० ५८ | ० १३ |
| | | | एकूण . . | ० ५८ | ० १३ |

अमरावती :

दिनांक २० जानेवारी २०२२.

(अवाच्य),
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
लघुसिंचन कामे
तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय समिती,
अमरावती.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.